# कोविड – १९ व भारतीय कृषी क्षेत्र

**डॉ. विनोद बागवाले**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
नबीरा महाविद्यालय, काटोल.
vbagwale@rediffmail.com

**सारांश ( Abstract) :**

३१ डिसेंबर २०१९ ला चीनच्या वुहान शहरात आढळलेल्या सर्वात पहिल्या कोरोना रूग्णापासून आजपर्यंत जगभर ३.५ कोटीच्या वर रूग्णांना कोरोनाचा प्रादुर्भाव झालेला आहे. भारतामध्ये सुद्धा ३० जानेवारी २०२० ला केरळमध्ये या रोगाची सुरूवात होऊन आज संपूर्ण भारतात रूग्णसंख्या ६५ लाखाच्या वर गेलेली आहे. भारतामध्ये कोरोनाच्या संक्रमणावर पायबंद बसावा याकरिता भारत सरकारने २५ मार्च २०२० पासून मे–जून २० पर्यंत संपूर्ण भारतभर टाळेबंदीची अंमलबजावनी केली. या टाळेबंदीचा गंभीर परिणाम इतर क्षेत्राप्रमाणेच भारतीय कृषी क्षेत्रावर पडलेला आहे. भारतीय कृषी क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचा कणा असून ग्रामीण रोजगारसंधी व उदरनिर्वाहाचे साधन म्हणून महत्त्वपूर्ण आहे. प्रामुख्याने टाळेबंदी दरम्यान आयात–निर्यात बंदी, वाहतुकीला प्रतिबंध, बाजार समितीच्या व्यवहारावर प्रतिबंध, प्रत्येक पातळीवरील सरकारचे वेगवेगळे दिशानिर्देष इ. मुळे भारतीय कृषी क्षेत्र प्रभावित झालेले आहे. या पार्श्वभूमीवर कोविड–१९ व टाळेबंदीमुळे कृषी क्षेत्रामध्ये होणाऱ्या उच्चावचनावर नियंत्रण ठेवणे अतिशय निकडीचे आहे. म्हणूनच विविध पातळीवरील सरकारने व्यापक उपाययोजना करून भारतीय कृषी क्षेत्रावर कोविड–१९ चा पडणारा विपरित प्रभाव नियंत्रित करणे वर्तमान काळाची गरज बनलेली आहे.

## १.१ प्रस्तावना :

जागतिक समुदायासाठी २०२० वर्षाची सुरूवातच भयंकर हानीकारक झालेली आढळून येत आहे. कोरोना विषाणू (काळा हंस) चा प्रादूर्भाव संपूर्ण जगभर या वर्षाच्या प्रारंभापासून होणे सुरू झाले. कोविड–१९ या नावाने कुप्रसिद्ध हा साथीचा रोग संपूर्ण जागतिक पातळीवर (जवळपास एकूण १२२ देशांत) आपले साम्राज्य पसरवित आहे. स्वाईन फ्ल्यू, स्पॅनिश फ्ल्यू, इन्फ्लूएंजा व ईबोला या सारख्या विषाणूपेक्षाही भयंकर प्रभावशाली स्वरूपाचा हा कोरोना विषाणू दिसत आहे. या कोरोना विषाणूचा प्रभाव जगातील इतर देशाप्रमाणेच भारत व भारतीय अर्थव्यवस्थेवर सर्वांगीण क्षेत्रव्यापी पडताना दिसत आहे. अमेरिकेसारखा बलाढ्य देश सुद्धा या कोरोनामुळे मेटाकुटीस आलेला दिसत आहे. भारतामध्ये सर्वप्रथम ३० जानेवारी २०२० ला केरळ येथे कोरोना रूग्ण आढळून आला व नंतर याची व्याप्ती वाढून आज संपूर्ण भारतभर ६० लाखांपेक्षा अधिक रूग्णसंख्या झालेली आहे. भारतामध्ये या कोरानाच्या दुष्प्रभावामुळे कृषी, औद्योगिक, व्यापार–व्यवसाय, वाहतूक सेवा व सांस्कृतिक इ. सर्वच घटक प्रभावित झालेले आहे. कोरोनाचा प्रभाव न्यूनतम करण्याच्या मुख्य उद्देशाने जगातील इतर देशांप्रमाणेच (स्वीडन वगळता) भारत सरकारने २५ मार्च २०२० पासून संपूर्ण भारताकरिता लॉकडाऊन (टाळेबंदी) जाहीर केलेली होती. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये या टाळेबंदीचा भारतातील कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जाते. मुळातच भारताने स्वातंत्र्यानंतर कृषी क्षेत्राच्याच सहाय्याने आपल्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेला आरंभ केलेला होता. आजही ग्रामीण लोकसंख्येला सर्वाधिक रोजगार पुरविणारे भारतातील कृषी क्षेत्रच आहे. अलीकडच्या काळात भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात (सरासरीने) १५ ते २० टक्के वाटा कृषी क्षेत्राचा आढळून येतो. भारत दरवर्षी ४०

बिलीयन डॉलर एवढी कृषी उत्पादनाची निर्यात करीत आहे. भारताच्या एकूण कार्यकारी लोकसंख्यपैकी ५२ टक्के लोकसंख्या या कृषी क्षेत्रावरच प्रत्यक्ष या अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. २०१८–१९ या आर्थिक वर्षात २८५.२१ दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन या कृषी क्षेत्रातून झालेले आहे. अशाप्रकारे भारताच्या प्रत्येक नागरिकाचा प्रत्यक्ष या अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्या या कृषी क्षेत्रावर कोविड–१९ मुळे आलेल्या टाळेबंदीचा प्रभाव अभ्यासणे क्रमप्राप्तच ठरते.

**१.२ बीजशब्द (Keywords)** –

कोविड–१९ , कृषी उत्पादन, ग्रामीण रोजगार पातळी, भारतीय अर्थव्यवस्था, कृषी क्षेत्र व टाळेबंदी

**१.३ संशोधनाचा उद्देश :**

१. कोविड–१९ चा भारतीय कृषी क्षेत्रावर पडणारा प्रभाव अभ्यासणे.
२. कोविड–१९ मुळे अस्तित्वात आलेल्या टाळेबंदीचा भारतीय कृषी क्षेत्राच्या प्रत्येक घटकावर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.
३. भारतीय कृषी क्षेत्रासमोर भविष्यात येणारी आव्हाने व उपलब्ध होणाऱ्या संधी याबाबत विश्लेषण करणे.
४. कोविड–१९ चा प्रभाव अनुकूलतम करण्यासाठी आनुषंगिक उपाययोजना सूचविणे.

**१.४ संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधनपद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असून पूर्णत: दुय्यम सामग्रीवर हे संशोधन आधारित आहे. याकरिता संशोधन अभ्यास विषयाशी संबंधित वर्तमानपत्रातील लेख, काही मासिके, ग्रंथ, अहवाल, बातम्या व संकेतस्थळावरील माहितीच्या आधारे प्रस्तुत शोधनिंबध तयार करण्यात आलेला आहे.

**१.५ पूर्व संशोधनाचा आढावा :**

**१. एस.एन.सिन्हा (१९६४)** &

देशातील कृषी उत्पादन पद्धती व विकास अवस्था यांचा सहसंबध श्री. सिन्हा यांनी विश्लेषित केलेला आहे. भारतासारख्या विकसनशील व अशिक्षित शेतकरी असणाऱ्या देशात प्रत्येक गोष्ट दैववादी पद्धतीने स्वीकारण्यात येते. सबब शेतीकडे व्यापारी दृष्टीने न पाहता केवळ जीवनाचा उदरनिर्वाह करण्याच्या दृष्टीनेच बघण्यात येते. अशा पार्श्वभूमीवर परंपरागत शेती पद्धतीत परिवर्तन करणे शक्य नसते.

**२.नववी पंचवार्षिक योजना (१९९७ ते २००२) –**

१९५० –५१ मध्ये भारतातील अन्नधान्य उत्पादन ५०८ लक्ष टन होते. ते १९९८–९९ मध्ये २००८ लक्ष टन पर्यंत वाढले. १९७६ पर्यंत भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. प्रो. गिलबर्ट इटईन यांच्या मते, ''भारताने अन्नधान्याच्या बाबतीत जी प्रगती केली त्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारचा दुष्काळ किंवा महामारी यामुळे भारतावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.''

**३. डॉ. व्ही.के.आर.व्ही.राव (१९७४) – यांच्या मते**

''भारतातील हरित क्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादनात प्रचंढ वाढ झालेली आहे. परंतु या वाढीचा लाभ सम प्रमाणात वितरित झालेला नाही. म्हणूनच ग्रामीण क्षेत्रामध्ये सामाजिक व आर्थिक विषमता अस्तित्वात आलेली दिसते.''

**४. एस. महेंद्र देव (८ एप्रिल २०२०) – यांच्या मते –**''टाळेबंदीमुळे भारतीय कृषी क्षेत्रातून उत्पादनाचा पुरवठा बाजारामध्ये करण्यात अडचण निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे विशेषत: उत्तर भारतामध्ये गहू आणि दाळीच्या कापणी व मळणी प्रक्रियेत वाहतूक सोयीच्या अभावामुळे व श्रमिकांच्या स्थलांतरणामुळे

मोठ्या प्रमाणात गतिरोध निर्माण झालेला आहे''

**५. तोमर (२९ एप्रील २०२०) – यांच्या मते**

''टाळेबंदीचा भारताच्या कृषी क्षेत्रावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, मात्र इतर क्षेत्रावर होईल. म्हणूनच भारतीय शेतकऱ्यांसाठी ही बाब अभिमानास्पद आहे.'

**१.६. कोविड–१९ – टाळेंबदी व कृषी क्षेत्र :**

भारतामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये या उद्देशाने भारत सरकारने संपूर्ण भारताकरिता २५ मार्च ते मे २०२० पर्यंत टाळेबंदी जाहीर केलेली होती. यामुळे भारतीय अर्थविकासाची प्रक्रिया खंडीत झालेली होती. वाहतुकीच्या अभावी विपणन प्रक्रियेवर मर्यादा आलेली होती. त्याचप्रमाणे निर्यातीअभावी देशाअंतर्गत कृषी उत्पादनाचा पुरवठा वाढलेला होता. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्रियान्वयन होण्याला अनेक मर्यादा घालून दिलेल्या होत्या. विशेषत: नाशवंत कृषी उत्पादनाला अनेक अडचणी निर्माण झालेल्या होत्या. कृषीला पूरक असणारे उद्योग व कुटीर उद्योग यांना सुद्धा या टाळेबंदीत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. एकंदरीत टाळेबंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत विकास प्रक्रियेत आलेली अनेक बंधने व मर्यादा यामुळे कृषी क्षेत्रावर प्रभावशाली परिणाम झालेला आढळून येतो.

**१. कृषीविषयक श्रमिकांची कमतरता**

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात लागलेल्या टाळेबंदीमुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्था ठप्प पडलेली होती. त्याचप्रमाणे सर्वच आर्थिक गतिविधीला अनेक मर्यादा आलेल्या होत्या. परिणामत: शेतश्रमिकांच्या आवागमनाला प्रचंड पायबंद बसला. यामुळे संपूर्ण भारतभर रब्बी पिकाच्या कापणी व मळणी प्रक्रियेला मोठ्या प्रमाणात शेतमजुराचा तुटवडा निर्माण झाला. उत्तर भारतात प्रामुख्याने पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेश या राज्यात गहू व दाळी या उत्पादनाच्या काढणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात श्रमिक समस्या निर्माण झालेली होती. याशिवाय केरळ येथील रबर उद्योग, आसामच्या चहा उद्योगाला व मध्यप्रदेश–महाराष्ट्र येथील फळे व फूल शेतीला प्रामुख्याने या शेतमजुरांच्या समस्येला तोंड द्यावे लागले. महाराष्ट्रात तर सोयाबीन या खरीप पिकाच्या काढणीला सुद्धा वर्तमान स्थितीत शेत श्रमिकांचा तुटवडा जाणवत आहे.

**२ शेतमालाच्या किंमतीत अत्याधिक चढउतार**

टाळेबंदी काळात निर्यात, वाहतूक व्यवस्था, साठवणूक सुविधा, शेतमजुर व बाजारसमित्या इ. घटक जे शेतमालाच्या मागणी पुरवठ्याच्या माध्यमातून किंमतीवर प्रभाव टाकतात त्या घटकांच्या गतिशीलतेवर अनेक मर्यादा आलेल्या होत्या. विशेषत: आंतरराष्ट्रीय वाहतूक बंदीमुळे निर्यात ठप्प होऊन देशाअंतर्गत कृषी उत्पादनाचा पुरवठा वाढून किंमती प्रचंड प्रमाणात कमी झालेल्या होत्या. त्याचप्रमाणे सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व इतर कार्यक्रमावरील बंदीमुळे कृषी उत्पादनाच्या मागणीत प्रचंड घट येऊन किमंतीत घट झालेली आहे. संचारबंदी व जनता बंदीमुळे सुद्धा कृषी उत्पादन विपणन प्रक्रियेत समस्या निर्माण झाली आहे. त्याच ठिकाणी अतिशय कमी किमतीला कृषी उत्पादनाची विक्री करावी लागली.

**३ फळबागा व फूलशेतीचे प्रचंड नुकसान**

शेतश्रमिकांच्या मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरणामुळे नाशवंत कृषी उत्पादनावर प्रचंड हानीकारक परिणाम पडलेला दिसून येतो. श्रमिक तुटवड्यामुळे अनेक फळबागावरील उत्पादने शेतातच खराब झालेले आढळुन आले. यामध्ये प्रामुख्याने काश्मिरची सफरचंद व पश्चिम महाराष्ट्रातील अंगुर या उत्पादनाचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. सार्वजनिक व धार्मिक कार्यक्रम ठप्प झाल्यामुळे फुलांच्या मागणीतही प्रचंड घट निर्माण झालेली होती. लग्न समारंभ, सजावट व स्वागत इ. क्रिया ठप्प असल्याने फुलशेती करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात प्रभावित झालेला होता. एकंदरित श्रमिकांचा तुटवडा, वाहतूकीच्या सोयीचा अभाव, निर्यात बंदी, उपभोगपातळीत

घट व मागणीतील कमी इ. प्रमुख कारणामुळे भारतातील फळबागा व फुलशेती यांना टाळेबंदीकाळात प्रचंड नुकसान सहन करावे लागले.

**४. कृषी उत्पादनाच्या निर्यातीत घट**

आंतरराष्ट्रीय सर्वच प्रकारची वाहतूक टाळेबंदी काळात बंद ठेवण्यात आलेली होती. याचा सरळ व प्रत्यक्ष परिणाम म्हणजे कृषी उत्पादनाच्या निर्यातीमध्ये संपूर्ण घट नोंदविण्यात आली. प्रामुख्याने भारताच्या निर्यात होणाऱ्या कापूस, चहा, मसाले व फळे इ. कृषी उत्पादनाला मोठ्या प्रमाणात निर्यातबंदीमुळे नुकसान सहन करावे लागले. भारतातून निर्यात होणाऱ्या कापूस व सूत या उत्पादनाचा ४० टक्के वाटा चीनचा असतो. परंतु कोरोनामुळे उद्भवलेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे या निर्यात प्रक्रियेत समाविष्ट घटकांचे सुमारे ५ हजार कोटी रू. चे नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे अनेक कृषी उत्पादने निर्यातीकरिता बंदरामध्ये तयार ठेवण्यात आलेली होती. ती टाळेबंदीमुळे तेथेच खराब झालेली पहायला मिळते. निर्यातबंदीमुळे देशाअंतर्गत कृषी उत्पादनाचा पुरवठा वाढून किंमती कमी झाल्यामुळे या क्षेत्रातील शेतकरी वर्गाचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

**५. कृषीविषयक आदांनाच्या उपलब्धतेत अडचण —**

लॉकडाऊनमुळे अनेक राष्ट्रातील उत्पादन क्रिया बंदच होती. परिणामतः कृषिविषयक आदानांचा पुरवठा प्रभावित झालेला होता. भारतामध्ये सुद्धा आयात बंदी व देशाअंतर्गत उद्योग बंदी यामुळे रासायनिक खते, बी—बीयाणे, किटकनाशके व इतर शेतीविषयक आदानांच्या उपलब्धतेत अनेक अडचणी निर्माण झाल्या. या अडचणींचा प्रमुख प्रभाव खरीप पीक लागवडीच्या पूर्वतयारीवर पडलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे सामाजिक अंतर, वाहतुकीवरील बंधने, बाजारातील व्यवहारांवर मर्यादा इ. प्रमुख कारणामुळे या कृषीविषयक आदानांच्या उपलब्धतेत असंख्य अडचणी निर्माण झाल्या.

६. **कृषीला पूरक व कुटीर उद्योगांना समस्या —**

टाळेबंदीच्या अंमलबजावणीकरिता सरकारने जाहीर केलेल्या दिशानिर्देशांचा अत्यंत विपरित प्रभाव ग्रामीण क्षेत्रातील पूरक व कुटीर उद्योगांवर पडलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने मत्स्यपालन, दुग्धपालन, शेळीपालन व कुक्कुटपालन इ. चा समावेश आहे. समाजमाध्यमांवरील अफवा व गैरसमजुतीमुळे टाळेबंदीच्या प्रारंभिक काळात कुक्कुटपालन उद्योगाला तर प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागले. बाजारावर असणाऱ्या अनेक प्रतिबंधामुळे कुटीरउद्योगातील पुरवठा सुरळीत होण्यास अनेक अडचणी निर्माण झालेल्या होत्या. अशाप्रकारे या कृषीला पूरक असणाऱ्या उद्योगातील समस्यांचा अप्रत्यक्ष परिणाम कृषी व ग्रामीण क्षेत्रावर झालेला दिसून येतो.

उपरोक्त प्रमुख परिणामांव्यतिरिक्त खालील सहाय्यक (दुय्यम) परिणाम सुद्धा टाळेबंदीच्या काळात कृषी क्षेत्रावर झालेले आढळून येतात.

- टाळेबंदी काळात अनिश्चिततेचे वातावरण असल्यामुळे अनेक लोकांनी साठेबाजी करून कृत्रिम तुटवडा निर्माण होण्यास पोषकता तयार केली.
- राष्ट्रीय पातळीवरील अघोषित संचारबदीमुळे दूध, फळे, फुले व भाजीपाला इ. नाशवंत कृषी उत्पादनाच्या मागणीत प्रचंड घट झाल्याचे नोंदविण्यात आले.
- कृषी उत्पादनाच्या शासकीय खरेदी प्रक्रियेत असंख्य अडचणी निर्माण झाल्या.
- कृषी क्षेत्रातील श्रमिकांनी आपल्या मूळ गावी स्थलांतर करतांना त्यांना पायी चालणे, अपघात, कुपोषण व आरोग्य विषयक समस्यांना तोंड द्यावे लागले.
- टाळेबंदी काळात शेतकरी वर्ग व शेतश्रमिक यांच्या उत्पन्नात प्रचंड घट झाल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा घसरला.

- टाळेबंदी काळात व्यवहार करतांना सातबारा किंवा ई–पास करिता अल्पशिक्षित शेतकरी वर्गाला प्रचंड मन:स्ताप सहन करावा लागला.
- खरीप पीक लागवडीच्या पूर्वतयारीसाठी टाळेबंदीमुळे असंख्य अडचणी आल्यामुळे कृषी उत्पादनात संभाव्य घटीची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे.
- टाळेबंदी दरम्यान निर्माण झालेल्या गोंधळामुळे खाद्यपदार्थ व इतर जीवनाश्यक वस्तूंच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे कृषी व ग्रामीण क्षेत्रातील लोकसंख्येला आर्थिक व इतर त्रास सहन करावा लागला.
- कृषी क्षेत्राद्वारे उद्योगाला जाणारा कच्चा माल पुरवठा प्रभावित झाल्यामुळे औद्योगिक उत्पादन व विकास दर माघारण्याची षक्यता आहे.

**१.७ निष्कर्ष %**

१. कोविड–१९ या विनाशकारी विषाणूच्या प्रादुर्भावामुळे रब्बी पिकाच्या कापणी व मळणी क्रियेत व खरीप पिकाच्या पूर्वतयारीकरिता असंख्य अडचणी निर्माण झाल्यामुळे सकल कृषी उत्पादन प्रभावित झाल्याचे आढळून आले.

२. टाळेबंदी दरम्यान गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नाशवंत कृषी उत्पादने (उदा. दुग्धजन्य, फळे, फुले व भाजीपाला) प्रचंड प्रमाणात सडून किंवा खराब होऊन शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

३. कोविड–१९ विषाणूच्या प्रसाराबाबत समाजमाध्यमावरील अफवा व लोकांच्या गैरसमजुती यामुळे प्रारंभिक काळात कृषी क्षेत्राला पूरक असणाऱ्या कुक्कुटपालन उद्योगाला प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

४. टाळेबंदीमध्ये कारखाने व अन्न प्रक्रिया उद्योग बंद राहिल्यामुळे ग्रामीण रोजगार पातळीवर विपरित प्रभाव पडलेला दिसून आला.

५. टाळेबंदीबाबतच्या प्रत्येक पातळीवरील प्रशासनाच्या विविध प्रकारच्या दिशानिर्देशामुळे शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध न झाल्यामुळे शेतकरी वर्गाचे आर्थिक नुकसान झाले.

६. निर्यातबंदीमुळे देशांतर्गत कृषी उत्पादनाचा पुरवठा वाढून किंमती कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाल्याचे नोंदविण्यात आले.

७. खरीप पिकांच्या पूर्वतयारीसाठी लागणाऱ्या कृषी आदानांचा तुटवडा निर्माण होऊन त्यांच्या किंमतीत वाढ झाली. याचाच परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ झाली.

८. धार्मिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमाच्या आयोजनावर टाळेबंदी दरम्यान विविध प्रतिबंध आल्यामुळे विशेषत: फुले व इतर कृषी उत्पादनाच्या मागणीत प्रचंड घट झाल्याचे आढळून आले.

**१.८ आव्हाने व संधी :**

**अ. आव्हाने**

१. कृषी क्षेत्रात कोविड–१९ मुळे निर्माण झालेल्या गोंधळाची स्थिती सामान्य करणे.
२. कृषी क्षेत्रात जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
३. साठवणूक सोयीचा विस्तार व विकास करणे.
४. पूरक व कुटीर उद्योगातील उत्पादनाला जास्तीत जास्त मागणी निर्माण करणे.
५. पिकविमा योजनेचा विस्तार करणे.
६. कृषी क्षेत्रातील पायाभूत सोयी–सुविधांचा विकास व विस्तार करणे.
७. कृषी क्षेत्रात इतर कृषी सहाय्यक व्यवसायाला प्रोत्साहन देणे.

८. निर्यातबंदीमुळे देशांतर्गत वाढलेल्या कृषी उत्पादन पुरवठ्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे.

**ब. संधी**

१. कृषी क्षेत्रात जास्तीत जास्त रोख (नगदी) पिकांच्या लागवडीला चालना देणे.

२. कमीत कमी कालावधीत कृषी उत्पादने तयार होतील अशा प्रकारची बी—बीयाणे (वाण) विकसित करणे.

३. आयातबंदीमुळे देशांतर्गत कृषी उत्पादनाची मागणी वाढल्याचा लाभ घेणे.

४. वाहतुकीवर आलेल्या निर्बंधामुळे स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त रोजगारसंधी निर्माण होत आहे.

५. स्थानिक नैसर्गिक व शुध्द दूध इतर कृषी उत्पादनाच्या मागणीत वाढ घडून आलेली आहे.

६. टाळेबंदी दरम्यान प्रदुषणात घट झाल्यामुळे कृषी उत्पादनाची गुणवत्ता उंचावली आहे.

७. आयात व आंतरराष्ट्रीय वाहतूक बंद असल्यामुळे स्थानिक व राष्ट्रीय कृषी उत्पादनाच्या मागणीला चालना मिळाली.

### १.९ उपाययोजना

१. कोविड—१९ मुळे निर्माण झालेल्या भीशण परिस्थितीमुळे कृशी क्षेत्रावर आलेल्या संकट निवारण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने भरीव आर्थिक पॅकेज जाहीर करावे.

२. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा विस्तार करण्यात यावा.

३. स्थलांतरीत श्रमिक तुटवडयामुळे कृशी क्षेत्रात जास्तीत जास्त यंत्र व तंत्र उपयोगाला प्रोत्साहन द्यावे.

४. कृशी उत्पादनाच्या विक्रिसाठी षासकीय स्तरावर विषेश व्यवस्था करण्यात यावी.

५. निर्यातबंदीमुळे देषांतर्गत वाढलेल्या कृशी उत्पादन पुरवठयाचे व्यवस्थापन करून जास्तीत जास्त षेतमाल प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी.

६. ग्रामीण रोजगार वृध्दीसाठी पूरक व कुटीर उद्योगांच्या विस्ताराला चालना देण्यात यावी.

७. षेतकरी वर्गाला आभासी साधनांच्या सहाय्याने लागवड प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, विक्री व किंमतपातळी याबाबत प्रषिक्षण देणे वा अवगत करणे.

८. कोविड—१९ व टाळेबंदी यामुळे षेतकरी वर्गाला झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे स्थानिक व राज्य सरकारने विविध प्रकारच्या सोयी व सवलती जाहीर कराव्यात.

## संदर्भ (Reference)


1. WHO. Corona virus disease ( COVID-2019) situation reports 2020.
2. htpp:// www.jagranjosh.com /general knowledge/what is the impact of corona virus on Indian Economy.
3. htpp://economictimes.induatimes.com
4. Mann, R.S. (2020, March 30).( Corona virus : Rabbi Harvest to be affected for want of farm workers.
5. लोकमत वृत्तपत्र १४ व १५ मे २०२०
6. खतिफ ए.के. : भारतीय कृषीच्या समस्या , मेहता पब्लीकेशन हाऊस पुणे.